# वसुधैव कुटुंबम्

येशु अल्लाह ईश्वर तू ; बुद्ध नानक महावीर तू
अग्यारीतला अग्नि ही तू ; सकल जनांचा आत्मा रे तू

व्यवहारातील दामही तू ; कामगाराचा घामही तू
शास्त्रज्ञ्यांची बुद्धि ही तू ; कलाकाराची प्रतिभा ही तू

मनाची रे सृजनता तू ; बुद्धि की समझ ही तू
डोळ्यामधले अश्रु ही तू ; ओठावरचे हास्य ही तू

जन्म देणारी माता ही तू ; पालन कर्ता पिता ही तू
शिकवणारा गुरु ही तू ; जगवणारा काळ ही तू

सृष्टि का निर्माता ही तू ; जीवन मृत्युचा दाता ही तू
कारण कर्म परिणाम तू ; सर्वांचा कर्ताकरविता ही तू

॥ॐ श्री समर्पयामि॥